चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२९ जानेवारी, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक २९/०१/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **बल्लारशाह, दुर्गापुर, शेंगाव, माजरी, चिमुर, तळोधी, सिंदेवाही, पोंभुर्णा, गडचांदुर, कोरपना, जिवती** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१७** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **०२** आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **३,८४,१००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२९ जानेवारी, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# वाहतुक पोलीसांचा कर्तव्यदक्षपणा

## रस्त्यावर मिळालेला पर्स अवघ्या दहा मिनिटात दिला मुळ मालकास परत

पोलीस हा समाजील एक मुख्य घटक असुन समाजाची सुरक्षा करणे हे त्याचे कर्तव्य आहे. पोलीसांना आपले कर्तव्य बजावित असतांना कायदा व सुव्यवस्था, वाहतुक, नैसर्गिक आपत्ती इत्यादी कामाची जबाबदारी त्यावर असते.

'वाहतुक पोलीस' यांचेशी दररोज सर्व स्तरातील नागरीकांचा संपर्क येतो. शहरातील प्रत्येक प्रमुख मार्गावर वाहतुक पोलीस नागरीकांच्या सुरक्षिततेकरीता तैनात असतात. रस्त्यावर वाहतुकीचे नियम, लहान मोठे अपघात न होवु देणे यासाठी वाहतुक पोलीस हा सतत उन वारा पाउस याची तमा न बाळगता कर्तव्य बजावित असतो.

दिनांक २९/०१/२०१९ रोजी नेहमीप्रमाणे वाहतुक पोलीस पोलीस शिपाई विकास मारकंडे हे आपले कर्तव्य बजावित असतांना त्यांना सिध्दार्थ होटेल ताडोबा रोड चंद्रपुर येथील चौकात एक काळया रगांची वस्तु दिसुन आली. रस्त्यावर हि वस्तु काय आहे याची शहानिशा करणे करीता पोलीस शिपाई विकास मारकंडे यांनी त्याकडे धाव घेतली असता एक जेंट्सपर्स दिसुन आले. ज्यामध्ये पॅन कार्ड, लायसन्स, नगदी रोख आणि इतर महत्वाचे कार्ड मिळुन आले. वाहतुक पोलीसाच्या लक्षता आले की, हि वस्तु कोणाच्यातरी मालकीची असेल आणि ती त्यांच्या कडुन हरविली आहे.

**पोलीस शिपाई विकास मांरकडे, संदीप जाधव आणि रामेश्वर डोईफोडे** यांनी त्या मिळालेल्या पॉकेटचा मालकाचा शोध घेतला परंतु जवळपास कोणीच मिळुन आला नाही. मिळालेला पॉकेट परत करण्यासाठी त्यांच्या संपर्क कसा होणार याबाबत त्यांची झटपट सुरू झाली. त्यांनी आपल्या स्मार्ट पोलीसींगच्या वापर करीत पॅन कार्ड वर नमुद नाव फेसबुकवर टाकुन सर्च केले असता पॅन कार्ड वरील नावाप्रमाणे शुभम उदापुरे नावाने एक फेसबुक अंकाउंट दिसुन आले. परंतु यावर कोणताही त्याचा फोन नंबर, घरचा पत्ता मिळुन न आल्याने त्यांनी सोशलमिडियाचा योग्य वापर करीत फेसबुक मेसेंजर मध्ये आपला मोबाईल क्रमांक पाठविला. जेनेकरून तो आपल्याला संपर्क करेल. मेसेज करताच अवघ्या दहा मिनिटांनी समोरून फोन आला आणि त्यास विचारपुस केली असता त्यांनी सांगीतले की हो माझाच पॉकेट हरविला आहे.

वाहतुक पोलीसांनी आपली कर्तव्यदक्षता, प्रामणिकपणा दाखवित सोशल मिडियाचा योग्य दिशेने वापर करीत समयसुचकतेचे दर्शन घडविले. मिळालेला पॉकेट हा ज्याच्या मालकीचा आहे त्याला परत देवुन पोलीस दलाची प्रतिमा उंचावुन उल्लेखनिय कामगीरी केली आहे